# प्रकरण तीन

## भविष्य निर्वाह निधी विभाग

**3.991 परिभाषित अंशदान निवृत्ती योजना शासन समतुल्य अनुदान येणे बाकी असल्याबाबत**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

भविष्य निर्वाह निधी विभागाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे अखेर एकूण 1464 एवढया शिक्षक कर्मचारी यांच्या वेतनातून अंशदान वर्गणीपोटी एकूण रक्कम रूपये 3,71,89,475/- कपात करुन जमा करुन ठेवण्यात आली आहे. त्या अनुषंगाने पडताळणी केली असता सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्टात दर्शविल्याप्रमाणे शिक्षकेतर कर्मचारी अंशदानाची शासनाकडील समतुल्य अनुदान पूर्ण प्राप्त झाल्याचे दिसून येते. जिल्हा परिषदेने पत्र क्रमांक सिंजिप/वित्त/फ/8/ (3)/2406/14, दिनांक 13/11/2014 अन्वये सन 2013-2014 या वित्तीय वर्षाच्या अखेरपर्यंतच्या शिक्षक कर्मचारी अनुदान रकमेची मागणी केलेली असून ते अद्यापर्यंत प्राप्त झालेले नाही. तसेच जिल्हा परिषदेने सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे अंशदानाची मागणी केलेली आढळून आलेली नाही.

**3.992 भविष्य निवार्ह निधी मधील सस्पेन्स खाती जमा रकमेबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** भविष्य निवार्ह निधी विभाग, जिल्हा परिषद, नाशिक सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणामध्ये भविष्य निर्वाह निधी सस्पेन्स खाते नोंदवही मध्ये सन 2014-2015 रूपये 6,76,342/- व सन 2015-2016 रूपये 4,95,006/- एकूण 11,71,348/- रक्कम जमा असलेले दिसुन आले. सदरच्या रकमे मध्ये 6 व्या वेतन आयोगाच्या देय हप्त्यापैकी काही हप्ते पंचायत समितीकडून दोन वेळा प्राप्त झालेने अशा प्रकारच्या रकमा सदर खाती जमा दर्शविलेल्या आहेत. 6 व्या वेतन आयोगाचे एकूण 5 हप्ते आहरीत करुन भविष्य निवार्ह निधी खात्यात जमा होणे आवश्यक असताना संबंधित पंचायत समितीने 5 हप्त्यापेक्षा जादा वेळेस फरकाच्या रकमा आहरीत करुन जिल्हा परिषदेकडे पाठविलेले उपरोक्त उदाहरणाबाबत दिसुन येते. सदरची बाब गंभीर असुन याबाबत आवश्यक पडताळणी करण्यात यावी. पंचायत समितीने जादा आहरीत करुन भविष्य निर्वाह निधी खाती जमा केलेली 6 वा वेतन आयोग फरकाची हप्त्याची रक्कम व इतर रकमा संबंधित शासन लेखाशिर्षाखाली भरणा करुन चलनाच्या प्रतीसह अनुपालन दर्शवावे.

**3.993 भविष्य निर्वाह निधी लेखा सन 2015-16 डे बुक तपासणी बाबत**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा संहिता 1968 नियम क्रमांक 231 नुसार नमुना क्रमांक 87 या विहित नमुन्या डे बुक ठेवण्यात आलेले नाही. जिल्हा परिषद धुळे यांनी नमुना 4 नमुन्यात नोंदवही ठेवण्यात आलेली आहे. विहित नमुन्यातील डे बुक ठेवण्यात आलेले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद, धुळे यांनी नमुना 87 या विहित नमुन्यामध्ये डे बुक ठेवलेले नाही. नमुना 4 पेटी कॅश बुक ठेवलेले आहे. तरी विहित नमुनयात ङे बुक ठेवणे आवश्यक आहे.

2) सन 2015-2016 या वर्षात लेजर मध्ये व्याजाची रक्कम परिगणीत करुन समाविष्ट केलेली आहे व व्याजाचा रकमेचा समावेश करुन अखेर शिल्लक नमुद केलेली आहे. तथापि सन 2015-2016 या वर्षाचे प्रत्यक्ष व्याज शासनाकडून जिल्हा परिषदेला प्राप्त झालेले नाही व सन 2014-2015 चे व्याज रुपये 7,01,01,000/- हे सन 2015-2016 मध्ये महालेखापाल यांनी समायोजीत केल्याचे जिल्हा परिषदेस कळविलेले आहे. याबाबत महालेखापाल यांचे पत्र प्राप्त झालेले आहे. तथापी, सदर रक्कम डे बुक मध्ये घेण्यात आलेली नाही. लेखा संहिता 1968 नियम 232 नुसार मिळालेले व्याज दैनिक पुस्तकाच्या जमा बाजूला घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे प्राप्त झालेले व्याज जमा बाजूला घेण्यात आलेले नाही.

3) सन 2015-2016 या वर्षात जिल्हा परिषदेमध्ये जमा झालेल्या रकमा 8336- नागरी ठेवी या लेखाशिर्षाखाली कोषागारात जमा केलेल्या आहेत. तथापि, सदर रकामाची चलन पडताळणी करण्यात आलेली नाही. जिल्हा परिषदेने कोषागारात जमा केलेली रक्कम हया कोषागारात जिल्हा परिषदेच्या खातीच जमा झालेली आहे याची चलन पडताळणी जिल्हा परिषदेने केलेली नाही. तसेच कोषागार पास बुक भरण्यात आलेले नाही व दिनांक 31/03/2016 अखेर जिल्हा परिषदेचे कोषागारात किती रक्कम 8336 या लेखाशिर्षाखाली जमा आहे? याबाबत शिल्लक प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. त्यामुळे डे बुक शिल्लक व कोषागार ताळमेळ याची पडताळणी करता आलेली नाही.

4) 8336- या लेखा शिर्षातून जिल्हा परिषदेने सन 2015-2016 या वर्षात रकमा काढलेलेल्या आहेत. सदर रकमांची कोषागाराशी ताळमेळ घेण्यात आलेला नाही.

5) जिल्हा परिषदेने दिनांक 31/03/2016 या वर्षाचे कोषागार शिल्लक प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही व पास बुक ठेवलेले नाही. यामुळे डे बुकात दर्शविण्यात आलेली रक्कम कोषागार शिल्लक प्रमाणे बरोबर आहे, याची पडताळणी करता आलेली नाही. तसेच बृहतपत्रकात दर महा एकुण जमा व काढलेल्या रकमेची बेरीज केलेली नाही. लेजर मध्ये परिगणीत केलेल्या व्याजाची रक्कम बृहतपत्रकात नमुद केलेली नाही व एकुण रकमेची बेरीज केलेली नाही. त्यामुळे डे बुकातील शिल्लक बृहतपत्रक व कोषागाराशी जमा शिल्लकेशी जूळलेली आहे, हे तपासता आलेले नाही.

6) सन 2014-2015 या वर्षाचे व्याजाची रक्कम सन 2015-2016 या वर्षात समायोजन करण्यात आलेली आहे. याबाबत महालेखापाल यांचे पत्र 241, दिनांक 21/02/2016 नुसार रुपये 7,01,01,000/- इतके व्याज समायोजीत करण्यात आलेले आहे, असे कळविलेले आहे. सदर व्याजाची रक्कम डे बुक मध्ये जमा करणे आवश्यक असतांना सन 2014-2015 ची रक्कम डे बुकात घेतलेली नाही.

जिल्हा परिषद मागील वर्षाच्या डे बुकातील जमा रकमेनुसार मोठया प्रमाणात तफावत दिसुन येते. मागील काही वर्षापासूनचा हिशेबाचा विचार करता ही तफावत मोठया प्रमाणात वाढण्याची शक्यता दिसून येत आहे. त्यामुळे भविष्यात भविष्य निर्वाह निधी रकमा अदा करणे शक्य होणार नाही, असे दिसून येत आहे. तरी जिल्हा परिषदेने मागील कालावधीचे बृहतपत्रक पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच मागील कालावधी पासून डे बुक अदयावत करुन डे बुक व बृहतपत्रकातील रकमा जुळविणे आवश्यक आहे. लेखा संहिता 1968 मधील नियम 234 नुसार खातेदार निहाय बृहतपत्रकात व्याजाची परिगणना करुन एकुण बेरीज केलेली नाही व त्याप्रमाणे व्याज प्राप्त केलेले नाही. व्याजाची रक्कम पुढील वर्षाच्या आरंभिच्या शिल्लक रकमेत जमा केलेली नाही. सबब डे बुक मागील कालावधी पासून व्याजाचा रकमा नोंदवून अदयावत करणे आवश्यक आहे. अखेर शिल्लक रकमेत व्याजाच्या रकमा जमा करुन शासनाकडून व्याज प्राप्त करणे आवश्यक आहे. बृहतपत्रक पूर्ण करण्यात यावे व बृहतपत्रक व डे बुकातील शिल्लक जूळविण्यात यावी. तरी याबाबत जिल्हा परिषदेने त्वरित बृहतपत्रक पूर्ण करुन डे बुक शिल्लक व बृहतपत्रकातील शिल्लक जूळविणे आवश्यक आहे.

**3.994 भविष्य निर्वाह निधी खात्यात नियमित कपात नसलेबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** भविष्य निर्वाह निधी विभाग, जिल्हा परिषद नंदुरबारचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणाचे वेळी भविष्य निर्वाह निधी विभागाने नमुना नंबर 87 व डे बुक यांची तपासणी केली असता सदरचे लेख्याच्या दिनांक 31/03/2016 पावेतोच्या नोंदी परिपुर्ण नोंदविलेल्या नसुन त्या अपुर्ण ठेवलेले असुन त्यातील असलेल्या बहुतांश नोंदी सिस पेन्सीलने नोंदविलेल्या असल्याने सदरच्या नोंदीत फेरफार करण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भविष्य निर्वाह निधी एकत्रित रक्कमा जमा करणे व काढणेसाठी दैनंदिन जमा खर्च नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना अशी नोंदवही अपुर्ण अवस्थेत ठेवल्याने, दैनंदिन किती रक्कमा जमा व खर्च झाल्यात याचा ताळमेळ घेता न आल्याने याबाबतची पडताळणी करता आली नाही.

2) रोजकिर्दीत सुरुवातीची शिल्लक व अखेर शिल्लक यांचा रोजच्या रोज लिहीणे आवश्यक असुन लिहीलेल्या नाहीत. तसेच रोजकिर्दीत मासिक गोषवारे काढलेले नाही. तसेच रोजकिर्दीतील बहुतांश नोंदी ह्या संबंधीत कर्मचाऱ्याने पेन्सिलीने लिहील्या आहेत.

3) संबंधीत विभागाच्या कर्मचाऱ्याने विभागास प्राप्त् झालेल्या जमा खर्चाच्या नोंदी रोजकिर्दीत दररोज नोंदी नोंदविण्याची जबाबदारी आहे. परंतु, रोजकिर्दीत नोंदी घेतल्या नाहीत. म्हणजे संबंधितांनी त्यांची जबाबदारी पार पाडल्याचे दिसुन येत नाही.

4) संबंधीत विभाग प्रमुखांनी व लेखापाल यांनी रोजकिर्दीच्या नोंदीची दररोज / वेळच्या वेळी तपासणी करुन नोंदी साक्षांकित करणे आवश्यक असतांना तपासणी केलेल्या नाहीत. त्यामुळे रोजकिर्दीत आर्थिक गैरव्यवहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) रोजकिर्दीत नोंदी साक्षांकीत नसल्याने नोंदवहीच्या रक्कमांची सत्यता पडताळता आली नाही.

**3.995 भविष्य निर्वाह निधी डे बुक मधील शिल्लक रकमा व कोषागार कार्यालयातील व महालेखाकार, मुंबई यांचे लेख्याशी ताळमेळ न घेणेबाबत.**

**जिल्हा परिषद जळगाव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा संहीता नियम 1968 चे नियम 223-224 नुसार भविष्य निर्वाह निधीचे लेखे डे बुक नमुना क्रमांक 87 लेजर क्रमांक 88 बॉडशीट नमुना क्रमांक 89 मध्ये जिल्हा परिषदेमध्ये ठेवण्याबाबत आदेश आहेत. महाराष्ट्र कोषागार नियम 1968 चे नियम 528 मधील तरतुदी नुसार तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्रमांक संकिर्ण 1008/प्र.क्र.68/कोषा.प्र.5/क, दिनांक 30/03/2009 डे बुक मधील 30/03/2016 अखेरची शिल्लक रक्कमेचा कोषागार व महालेखाकार मुंबई यांचे लेख्याशी (8336 नागरी ठेवी जिल्हा परिषद भविष्य निर्वाह निधी) चा ताळमेळ घेण्याची तरतुद करण्यात आली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

दिनांक 31/03/2016 अखेरची शिल्लक रक्कम रुपये 3,24,04,82,054/- सदर रकमेचा कोषागार व महालेखाकार, मुंबई यांचे लेख्यांशी ताळमेळ घेतलेला नाही. तरी सदर रक्कमेचा ताळमेळ घेतलेला नाही. ताळमेळ घेऊन तसे अनुपालन सादर करावे.

**3.996 लेखे अपुर्ण असतांना कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधी खात्यामधुन परतावा / नापरतावा अग्रीम प्रदान ़ केलेबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा परिषद अहमदनगरचे सन 2015-2016 चे भविष्य निर्वाह निधीचे लेख्यांची तपासणी केली असता लेखापरीक्षणांस असे निदर्शनास आले की, कर्मचा-यांना त्यांचे खात्यावरील शिल्लकेची तपासणी न करताच व भविष्य निर्वाह निधीची खतावणे न लिहीताच लेखे अपुर्ण असतांनाच परतावा / ना परतावा अग्रीमे मंजुर केलेली आहेत.

खातेदारांना त्यांच्या खात्यावरील शिल्लकेची निश्चिती झालेली नसतांना रक्कमा प्रदान केल्यामुळे नियमबाह्य व जादा रक्कमांची प्रदाने झाली किंवा कसे? याची लेखापरीक्षणांत खात्री करता आली नाही. अशा सर्व प्रदानांचा आढावा घेऊन अनुज्ञेय रक्कमेपेक्षा नियमबाह्य व जादा रक्कमांची प्रदाने झालेली नाहीत, याबाबत लेखापरीक्षणाची खात्री करावी. तसेच सर्व कर्मचा-यांची अपुर्ण खाती अद्ययावत करुन अनुपालन दर्शवावे.

**3.997 ताळमेळाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** भविष्य निर्वाह निधी, जिल्हा परिषद, साताराचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

1) भविष्य निर्वाह निधी सन 2015-2016 या आर्थिक वर्षाचे प्रधान लेखाशिर्ष 8336 चा कोषागाराशी ताळमेळ घेतलेला आहे. त्याबाबत सन 2015-2016 या आर्थिक वर्षाचा ताळमेळ पुर्ण झालेबाबतचे कोषागार अधिकारी, सातारा यांचे पत्र जावक क्रमांक कोष/सातारा ठेव/8336 ताळमेळ/10/2016, दिनांक 25/10/2016 चे

पत्राचे अवलोकन केले. तसेच जिल्हा कोषागार कार्यालयाकडून महालेखापाल मुंबई यांचे पत्र क्रमांक Deposit/8336 Recn/Satara/565, दिनांक 06/10/2016 अन्वये 8336 नागरी ठेवी मधील आर्थिक वर्ष सन 2015-2016 मधील जमा व खर्च रकमांचा ताळमेळ कोषागार कार्यालयाच्या लेख्यांवरुन घेण्यात आल्याबाबत संमती (Acceptance) प्राप्त झालेले आहे. परंतु, कोषागार अधिकारी, सातारा व महालेखापाल, मुंबई यांचे पत्रात 8336 नागरी ठेवी या लेखाशिर्षाच्या सन 2015-2016 च्या जमा रक्कमा व खर्च रक्कमा बरोबर आहेत असाच उल्लेख आहे. मात्र त्या वर्षातील / महिन्यातील सुरुवातीची शिल्लक व अखेरच्या शिल्लक जुळतात याबाबत पत्रात कोठेही उल्लेख नाही.

तरी 8336 नागरी ठेवी या लेखाशिर्षाच्या नमुना नंबर 7 ची शिल्लक, कोषागारातील शिल्लक व महालेखापाल मुंबई यांचेकडील विवरणपत्रातील शिल्लक यामधील सुरवातीची शिल्लक व अखेरची शिलकेत तफावत आहे किंवा जुळत असलेबाबत साधार पुर्तता दाखवावी.

**3.998 भविष्य निर्वाह निधी व्याजाबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** भविष्य निर्वाह निधीचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षण करताना लेखे उपलब्ध करणेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 08/08/2017 दिले होते. त्यानुसार उपलब्ध केलेल्या लेख्याची पडताळणी करून भविष्य निर्वाह निधीचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षण करताना जिल्हा परिषदेने शासनाकडे रक्कम रूपये 3,18,00,000/- ची मागणी केल्याचे दिसून आले, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महालेखापाल यांच्याकडील व्याज समायोजन करणेसाठीचा नमुना पहाता (परिशिष्ट क्रमांक 5) नुसार आहे.

लेजरनुसार एकूण जमा व खर्च नोंदवून व्याज मागणी करणे आवश्यक असताना लेजर खातेवहीची एकूण बेरीज गोषवारा काढलेला नसल्यामुळे समायोजन करणेचे व्याजाचा प्रस्ताव योग्य रक्कमेचा महालेखापाल यांना सादर केल्याची व त्यानुसारच व्याज समायोजित झाल्याची खात्री करता येत नाही.

2) सन 2010-2011 पासून अद्याप व्याज येणे असल्याचा प्रस्ताव शासनास सादर केल्याचे दिसून आले. तरी सदर व्याज रक्कम रूपये 26,27,65,000/- प्राप्त करून घेवून पूर्तता दाखवावी.

3) महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-1008/प्र.क्र.68/कोषा प्र-5, दिनांक 30/03/2009 नुसार कोषागारातील रक्कमेचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. तथापि, सन 2008-2009 ते 2009-2010 अखेर ताळमेळ होणे बाकी असलेने त्याबाबत खात्री करता येत नाही. तरी ताळमेळ घेवून जमा रक्कम, सुरुवातीची शिल्लक, खर्च, व्याज अखेर शिल्लक याबाबत कागदपत्रासह खात्री करून देणेत यावी.

**3.999 नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना अभिलेख्यामधील उणीवांबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो-1005/126/सेवा-4, दिनांक 07/07/2007 अन्वये शासनाने दिनांक 01/11/2005 रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यासाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू केली असून ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो-1007/प्र.क्र.181/आस्था-11, दिनांक 21/05/2010 अन्वये जिल्हा परिषद कर्मचारी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना अंमलबजावणी कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली आहे. सदर योजनेचे जिल्हा परिषद, वित्त विभागाने सन 2015-16 या वित्तीय वर्षाचे सदर योजनेचे लेखे तपासणीस मागणी केली असता ते सादर न केल्याने तसा आशयाचा आक्षेप नमूद करण्यात आला होता. परंतू दिनांक 18/09/2017 रोजी अहवाल अंतिमीकरणाच्या वेळी याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याशी झालेल्या चर्चेप्रमाणे सदर योजनेचे अंशता अभिलेखे उपलब्ध करुन देत असल्याचे कळविल्याने त्या अनुषंगाने सादर केलेल्या लेख्यांची तपासणी केली असता त्यातील उणींवांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) सदर योजनेचे जिल्हा परिषद, वित्त विभाग़ाने सन 2015-16 मध्ये सादर केले असता 1) शिक्षक कर्मचारी वगळता शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सममूल्य अंशदान रक्कम वर्गणी जमा करणे करिता शासनाकडून जिल्हा परिषदेस रक्कम रूपये 4,22,00,000/- इतके अनुदान प्राप्त झाले आहे. प्राप्त अनुदान रक्कम जिल्हा परिषदेने 8342-इतर ठेवी,117-शासकीय कर्मचारी परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजना या लेखाशीर्षाखाली समायोजित केली आहे. तथापी सदर आर्थिक वर्षात कर्मचारी अंशदान वर्गणी रक्कम रूपये 4,22,56,667/- इतकी जमा झाली असताना शासन हिस्स्याची सममूल्य अंशदान रक्कम रूपये 4,42,00,000/- इतकी समायोजित केल्याने शासनाची रक्कम रूपये 19,43,333/- इतकी जादा रक्कम समायोजित केली आहे. त्यामुळे शासनाची रक्कम रूपये 19,43,333/- नाहक अडकून पडली आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो-2016/ प्र.क्र.07/वित्त-5, दिनांक 19/03/2016 अन्वये जिल्हा परिषदेस परिभाषित अंशदान निवृती वेतन योजना कर्मचारी (शिक्षक वगळून) निधीवरील व्याजाच्या रक्कमा जमा करण्याकरीता रक्कम रूपये 5,75,00,000/- निधी मंजूर झाला असून सदर रक्कमेचे जिल्हा परिषदेने शासन निधीत समायोजन केले आहे. परंतू योजनेंअंतर्गत जमा निधीवर प्रत्यक्ष किती व्याज रक्कम आहारीत करणे आवश्यक आहे याचा तपशिल सादर केलेला नाही. त्यामुळे व्याजापोटी समायोजीत रक्कम योग्य असल्याची पडताळणी करता आली नाही.

3) कर्मच्या-यांच्या वेतन देयकांतून कपात केलेल्या रक्कमा (आरोग्य विभाग) रक्कम रूपये 31,642/- कोषागार खाती चलनाने जमा केल्या आहेत. परंतू सदर चलनाची रक्कम दैंनिक रोजकिर्दीस जमा नसल्याचे दिसून आले आहे.

4) दैंनिक रोकडवहीप्रमाणे सदर निधीची दिनांक 31/03/2016 अखेर रक्कम रूपये 34,52,78,125/- शिल्लक असून सदर रक्कमेचा कोषागाराशी मेळ घेण्यात आलेला नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो-1007/ प्र.क्र.181/आस्था-11 दिनांक 21/05/2010 मधील परिच्छेद क्र.23 प्रमाणे जिल्हा परिषदेकडील परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या अभिलेख्याची देखभाल मुख्य वित्त व लेखा अधिकारी यांनी करणेची असून प्रत्येक वर्षाची वार्षिक हिशेब चिठ्ठी 30 जुन पर्यंत संबंधीत कर्मच्या-यास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सदर योजने अंतर्गत 2,134 शिक्षक व 1,436 शिक्षकेत्तर कर्मचारी असे एकुण 3,570 कर्मचारी सदर योजनेअंतर्गत अंशदान देत असून त्यांना त्यांच्या मासिक वेतन देयकातून दरमहा कपात केलेली अंशदानाची रक्कम व जिल्हा परिषदने जमा केलेल्या सममुल्य अंशदानाची रक्कम व त्यावर मिळालेले व्याज किती आहे याबाबत खतावणी तयार करुन संबंधीतांना वार्षिक हिशेब चिठ्ठी चे वाटप केलेले नाही. ही गंभीर अनियमितता आहे.

6) योजनेंतर्गत कर्मचाऱ्याकडून वसूल केलेले निवृत्ती वेतन अंशदान रक्कमेची दैनिक नोंदवही नमुना आर-4 प्रमाणे सन 2015-16 मध्ये जमा कर्मचारी अंशदान, शासन सममुल्य हिस्सा व त्यावर प्राप्त व्याज याचा मेळ जिल्हा परिषद, वित्त विभागाने कर्मच्या-यांच्या वैयक्तिक खतावणी नोंदवही व ब्रहतपत्रक नोंदवहीशी घेतलेला नाही.

7) परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना निधीची दैनिक पुस्तक प्रमाणे वर्षअखेर शिल्लक व 8342-इतर ठेवी,117-शासकीय कर्मचारी परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजना या लेखाशीर्षाखाली कोषागार खाती शिल्लक रक्कम याचा उपरोक्त शासन निर्णयाचा परिच्छेद 21 मध्ये नमूद केल्याप्रमाणे आर-7 नमुन्यात मेळ घेण्यात आलेला नाही.

8) कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकातून दरमहा जमा झालेल्या अंशदानाची रक्कम व जिल्हा परिषदेने जमा केलेल्या सममूल्य अंशदानाची रक्कम 8342-इतर ठेवी,117-शासकीय कर्मचारी परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजना या लेखाशीर्षाखाली शासन खाती कोषागारात जमा करणेची असून त्याचा मासिक मेळ घेण्यात आलेला नाही.

9) ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयात सूचित केल्याप्रमाणे मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या सदर योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यास निवृत्ती लेखाक्रमांक देणे आवश्यक आहे. दिनांक 31/03/2015 अखेर 1,262 शिक्षक व 1,342 शिक्षकेत्तर अशा एकूण 2,604 कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन लेखाक्रमांक दिले असुन लेखाक्रमांक दिलेल्या कर्मच्या-यांचा तपशिल नोंदवहीत एकत्रीत बांधणी करून जतन केलेला नाही.

10) योजनेंतर्गत असलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांच्या अंशदान एवढी अनुरूप रक्कम शासनाकडून जिल्हा परिषदेस प्राप्त न झाल्याने ती शासन खाती जमा झालेली नाही त्यामुळे योजनेंतर्गत नोंदणीकृत शिक्षक कर्मचार्यांच्या खाती जमा अंशदानवरील देय व्याजाची जिल्हा परिषदेने परिगणना केलेली नाही. तसेच बऱ्याच अंशी शिक्षक कर्मचाऱ्यांची मासिक अंशदानाची रक्कम संबंधीत अधिकाऱ्यांनी त्यांच्या वेतानांतून वसूल केलेली नाही.ही बाब गंभीर आहे.

11) ग्रामविकास विभाग दिनांक 21/05/2010 च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन निधी योजनेखालील कर्मचाऱ्यांची लेखा नोंदवही नमुना क्रमांक आर-5 व योजनांतर्गत कर्मचारी खातेनिहाय जमा होणारी रक्कम याबाबतचा तपशील दर्शवणारी नोंदवही आर-6 मध्ये नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

**3.1000 कोषागार कार्यालय व जिल्हा परिषद यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या शिल्लक रक्कमेतील तफावतीबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** भविष्य निर्वाह निधी विभागाकडील अभिलेखे व कोषागार कार्यालयाकडील विविरणपत्रानुसार तफावत दिसून येते. सदर तफावतीबाबत भविष्य निर्वाह निधी विभागाकडून दरवर्षी ताळमेळ घेणे आवश्यक असताना तसा ताळमेळ घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त प्रमाणे भविष्य निर्वाह निधी विभाग, जिल्हा परिषदेची शिल्लक ही कोषागार कार्यालयाच्या शिल्लके पेक्षा रूपये 1,85,87,66,995/- (रूपये एकशे पंच्याऐंशी कोटी, सत्त्याऐंशी लाख, सहासष्ट हजार, नउशे पंच्यान्नव फक्त) पेक्षा जास्त आहे. सदर मोठ्या प्रमाणातील तफावतीबाबत योग्य तो खुलासा होत नाही.

**3.1001 शिक्षकांची अंशदायी निवृती वेतन योजनेची वर्गणी कपात करण्यात आली नसल्याबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 01/11/2005 नंतर शासन सेवेत नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर यांची परिभाषित अंशदायी निवृत्त योजनेची (DCPS) वर्गणी वेतनातून वसूल करणे आवश्यक असताना जिल्हा परिषद, शिक्षण विभागाने शिक्षकांची वर्गणी वसूल केलेली नाही. त्यामूळे दिनांक 01/11/2005 नंतरच्या शिक्षकांचे सदर योजनेची कोणतेही लेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. त्यामूळे सदर शिक्षकांची जमा रक्कम व शासन अंशदान यांच्या रक्कमेची तपासणी करता आलेली नाही.

2) लेखे उपलब्ध नसल्यामूळे दिनांक 01/11/2005 नंतर नियुक्त झालेल्या सर्व शिक्षकांना सदर योजनेचे सभासद करून घेण्यात येवून त्यांना क्रमांक देण्यात आलेले आहेत. याबाबत खात्री करता आलेली नाही. तसेच सदर शिक्षकांना प्रत्येक वर्षी स्लीपा देण्यात आल्या किंवा नाही? याची खात्री करता आलेली नाही.

3) शिक्षण विभाग यांच्याकडून देण्यात आलेल्या उत्तरामध्ये नमूद दिनांक 29/10/2010 शासन निर्णयास मा.उच्च न्यायालय यांनी स्थगीती देण्यात आली असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि, सदर निर्णयाची प्रत लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

**3.1002 भविष्यं निर्वाह निधीच्या तसेच डीसीपीएसच्या रक्कमा चलनाद्वारे बँकेत जमा केल्यानंतर कोषागार कार्यालयासोबत रक्कम योग्य शिर्षाखाली जमा झाल्याबाबत ताळमेळ न घेणेबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परिषद अमरावती भविष्य निर्वाह निधी विभाग सन 2015-2016 या वर्षात नमुना नंबर 87 दैनिक पुस्तंकाची पडताळणी केली असता दर महिन्याला भविष्य निर्वाह निधीची रककम चलानदवारे बँकेत जमा झाल्यानंतर त्याचे विवरणपत्र तयार करुन सक्षम अधिकारी यांचे स्वाक्षरीने कोषागार कार्यालय यांना पत्र देवुन जमा झालेल्या रक्कमेचा ताळमेळ घेवुन कोषागार कार्यालयाकडुन सक्षम अधिकारी यांचे सही व शिक्क्यानिशी रककम योग्यं लेखाशिर्षात जमा झाल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असते. परंतु सन 2015-2016 या वर्षात तसेच त्याआधीच्या वर्षात जिल्हा परिषद अमरावती यांनी तशी कार्यवाही केली नसल्याचे दिसुन आले.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी कोषागार कार्यालय अमरावती यांना दिलेले पत्र क्रमांक जिप/वित्त/सा.भ.नि./2502/2016, कार्यालय जिल्हा परिषद अमरावती दिनांक 22/07/2016 नुसार भविष्य निर्वाह निधी कपातीचे सन 2014-15 पर्यंत ताळमेळ करुन देणेबाबत विनंती केली आहे. डे बुक नुसार दिनांक 31/03/2016 अखेर भविष्य निर्वाह निधी खात्यात रुपये 2,94,36,06,909/- शिल्लक आहे. त्याचा कोषागाराशी ताळमेळ घेण्यात यावा.

सन 2015-2016 मध्ये डे बुक नुसार रुपये 17,84,01,348/- वर्गणी जमा झाली आहे. परंतु प्रत्यक्षात रुपये 46,51,79,650/- जमा झाल्याचे दिसते. दोन्ही मध्ये रुपये 28,67,78,302/- चा फरक आहे. तरी फरकाबाबत खुलासा करुन त्याचा कोषागाराशी ताळमेळ घेण्यात यावा.

अंशदायी निवृत्ती वेतन योजनेच्या अंशदानाची तपासणी केली असता कोषागार अमरावती यांचे पत्र क्रमांक 7813, दिनांक 07/08/2015 नुसार नमुना R-7 मध्ये रुपये 3,97,659/- दिनांक 31/03/2011 Missing असल्याचे कोषागार कार्यालयाने कळविले आहे. जिल्हा परिषद अमरावती यांचे पत्र क्रमांक 2197 /2016 दिनांक 29/06/2016 नुसार त्याबाबत जिपने खुलासा केला आहे. तरी त्याबाबत पाठपुरावा करुन रुपये 3,97,659/- चा ताळमेळ घेवुन missing Credit करुन अनुपालन दाखवावे.

वारंवार आक्षेप नोंदवुन सुध्दा त्याबाबत कार्यवाही न करणे ही गंभीर स्वंरुपाची बाब आहे. याबाबत वरिष्ठांचे लक्ष वेधण्यात येत असुन दिनांक 01/10/2008 ते 31/03/2016 या कालावधीतील भविष्य निर्वाह निधीच्या जमा रक्कमांचे कोषागार कार्यालयासोबत ताळमेळ घेवुन अनुपालन सादर करावे.

**3.1003 भविष्य निर्वाह निधी खातेवर शासनाकडून प्राप्त होणारे व्याजाची रक्कम प्रत्यक्षात देण्यात येणारे व्याजाच्या रक्कमे पेक्षा कमी प्राप्त होणे बाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत रक्कम रूपये 26,22,67,598/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरील शासनाकडे व्याजाची मागणी व प्राप्त रक्कमेबाबतची नस्ती लेखापरीक्षणास अर्धसमास पत्रान्वये मागणी करूनही सादर करण्यात आली नाही.

2) भविष्य निर्वाह निधी विभागाने शासनाकडून प्रत्येक वर्षी मिळणा-या कमी व्याजा बाबत काय कार्यवाही केली. याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणादम्यान दाखविण्यात आले नाही.

3) विभागाने सदरील विवरणामध्ये सन 2003-2004 ते 2015-2016 पर्यंतच्या रक्कमेचा उल्लेख केला आहे. परंतु, त्या अगोदरच्या वर्षामध्ये सुध्दा अशा प्रकारची तफावत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. माहितीसह अनुपालन सादर करावे.

4) भविष्य निवाह निधी विभागाला जवळपास प्रत्येक वर्षी कमी प्रमाणात व्याज प्राप्त होत होते. त्यामुळे त्यांनी मिळालेल्या तेवढयाच रक्कमेला अनुपातामध्ये विभागून व्याज देणे आवश्यक होते. परंतु, तशाप्रकारची कार्यवाही का करण्यात आली नाही?

5) भविष्य निर्वाह निधी विभागाला प्रत्येक वर्षी शासनाकडून कमी व्याजाची रक्कम प्राप्त झाली. परंतु, विभागाने जिल्हा परिषद कर्मचा-याच्या भविष्य निर्वाह निधी खातेवर शासन निर्णयाप्रमाणे व्याजाची रक्कम जमा दर्शविली आहे. सन 2003-2004 ते 2015-2016 पर्यंत एकूण फरकाची रक्कम ही रुपये 26,22,67,598/-एवढी झाली आहे. भविष्यात सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांचा विचार करता विभागाला मोठया प्रमाणावर आर्थिक अडचणीचा सामना करावा लागेल. याबाबत संबंधीतांनी विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे मत लेखापरीक्षकाचे आहे.

**3.1004 6 वा वेतन आयोगाच्या हप्त्याच्या रक्कमेची नोंद पुन्हा पुन्हा होणेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत रक्कम रूपये 2,28,395/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त प्रमाणे जादा जमा झालेली रक्कम रूपये 2,28,395/- ही संबंधीताच्या वैयक्तीक खातेमधून वजा करून ( मुददल + व्याज) शासन खाती जमा करून अनुपालन दर्शवावे.

2) विभागाने सदरील 6 वा वेतन आयोगाच्या थकबाकीच्या रक्कमेच्या नोंदी ज्या प्रमाणे पंचायत समितीने पाठविल्या, त्याप्रमाणे घेतल्या आहेत. त्या रक्कमेची खातरजमा / पडताळणी करण्यात आली नाही. पडताळणी करून अनुपालन दर्शवावे.

अशा प्रकारच्या आणखी दुबार नोंदीची शक्यता नाकारता येत नाही.

**3.1005 भविष्य निर्वाह निधीचे दैनिक पुस्तक नमुना 87 मध्ये जमेच्या नोंदी न घेतल्याबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 231 (अ) नुसार नमुना 87 मध्ये दैनिक पुस्तक ठेवण्यात आले, परंतु सदर नोंदवहीत माहे सप्टेंबर 2015 पासून ते मार्च 2016 अखेर दैनिक जमेच्या नोंदी घेण्यात आल्या नाहीत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 232 नुसार नमुना 87 मध्ये महिन्यामधील एकुण वर्गण्या, परिषदेची अंशदाने व मिळालेले व्याज दैनिक पुस्तकातील जमेच्या बाजूस नोंदविणे आवश्यक असतांना त्यानुसार विभागाने कार्यवाही केली नाही. तसेच व्यवहार होईल अशा प्रत्येक दिवशी दैनिक पुस्तकांतील नोंदीचे समतोलन करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

3) सदर नोंदवहीत परतावा ना-परतावा अग्रीम देयकाच्या नोंदी घेण्यात आल्या आहेत. परंतु सदरच्या नोंदी कार्यालय प्रमुख यांचे स्वाक्षरीने प्रमाणित केलेल्या नाहीत.

4) लेखापरीक्षण पथकाचे पत्र क्रमांक 1, दिनांक 22/09/2016 भविष्य निर्वाह निधी संबंधीच्या नोंदवह्या अद्ययावत नोंदीसह लेखापरीक्षणात तपासणीस उपलब्ध करुन देणेबाबत कळवून सुध्दा तसेच अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 26/09/2016 नुसार सदरची नोंदवही परिपुर्ण नोंदीसह उपलब्ध झाली नसल्याचे कळवून सुध्दा सदरची नोंदवही परिपुर्ण नोंदीसह पुर्ण करुन तसेच जमा व खर्चाच्या नोंदी कार्यालय प्रमुखाचे स्वाक्षरीने प्रमाणित करुन सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही विभागाने केली नाही.

5) दैनिक पुस्तकामध्ये वर्ष अखेर जमा व खर्चाचा गोषवारा तसेच वर्षभरात मिळालेले व्याज व वर्ष अखरे शिल्लक याचा गोषवारा नमूद केला नाही. त्यामुळे भविष्य निर्वाह निधीचा हिशोब अचूक असल्याचे लेखापरीक्षणात प्रमाणित करता आले नाही.

**3.1006 परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना वर्गणीधारकाच्या वेतनातुन वजाती केलेल्या डीसीपीएस रक्कमा नियमबाहयपणे भविष्य निर्वाह निधीचे खात्यात जमा केल्याबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 45,921/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कर्मचाऱ्यांचे वेतनातून कपात केलेल्या भविष्य निर्वाह निधी वर्गणी व परतावे तसेच परिभाषित अंशदान वजातीच्या रक्कमा भविष्य निर्वाह निधी व डि.सी.पी.एस. खात्यात जमा करण्यासाठी पंचायत समितीकडून वेगवेगळे धनाकर्ष काढून ते विभागास सादर करणे आवश्यक असतांना पंचायत समितीने भविष्य निर्वाह निधी व डी.सी.पी.एस. चे एकत्र धनाकर्ष नियमबाह्यपणे काढले आहेत.

2) भविष्य निर्वाह निधी विभागाने प्राप्त विवरणाची व तपासणी करणे आवश्यक असतांना विभागाने कोणत्याही प्रकारची छाननी अथवा तपासणी न करता भविष्य निर्वाह निधीचे व डी.सी.पी.एस. रक्कमाचे एकत्रीत धनाकर्ष स्विकारुन डि.सी.पी.एस.च्या रक्कमा नियमबाह्यपणे भविष्य निर्वाह निधीचे खात्यात जमा केल्या आहेत.

3) वरीलप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या परिभाषित अंशदानाच्या रक्कमा परिभाषित अंशदान संबंधीच्या विहीत नमुन्यातील नोंदवह्यात रक्कमांच्या नोंदी घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही विभागाने केली नाही.

4) भविष्य निर्वाह निधीचे रक्कमा सोबत डी.सी.पी.एस.च्या प्राप्त झालेल्या रक्कमाच्या काही नोंदी नियमबाहयपणे भविष्य निर्वाह निधीचे दैनिक पुस्तकात घेण्यात आल्या आहेत. व त्या रक्कमा भविष्य निर्वाह निधीचे खात्यात जमा केल्या आहेत.

5) वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या रक्कमा संबंधीत कर्मचाऱ्यांचे खात्यात लेखापरीक्षण दिनांकापर्यंत जमा झाल्या नाहीत. त्या रक्कमा भविष्य निर्वाह निधीचे खात्यातून काढून डी.सी.पी.एस.च्या खात्यात व संबंधीत वर्गणीधारकाच्या खात्यात जमा करण्यात याव्यात.

6) डि.सी.पी.एस. धारकाच्या रक्कमा भविष्य निर्वाह निधीचे खात्यात जमा केल्यामुळे डी.सी.पी.एस. धारकांना शासन हिस्याची रक्कमेपासून व त्यावर मिळणाऱ्या व्याजापासून वंचित राहावे लागले आहे.

7) वरीलप्रमाणे इतर महिन्यातील तसेच इतर पंचायत समिती अंतर्गत डि.सी.पी.एस. धारकाच्या रक्कमा भविष्य निर्वाह निधीचे खात्यात जमा केल्या नसल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत आपले स्तरावर भविष्य निर्वाह निधी व डि.सी.पी.एस. वजातीच्या विवरणपत्राची तपासणी करुन डी.सी.पी.एस.च्या रक्कमा योग्य त्या लेखाशिर्षात व सबंधीताच्या वैयक्तीक खात्यात जमा करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-1007/प्र.क्र. 181/आस्था-11, दिनांक 21/05/2010 चे शासन आदेशानुसार जिल्हा परिषद कर्मचारी यांचेकरीता परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेची अंमलबजावणी करण्यात आली नाही.

9) वरील शासन निर्णयामधील सूचना क्रमांक 19 (इ) अन्वये जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे अंशदान तसेच जिल्हा परिषदेच्या अंशदानाची रक्कम शासन खाती भरणा करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केली नाही.

**3.1007 नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या अंशदानाच्या रक्कमा सेवा सोडुन गेलेल्या कर्मचाऱ्यांना परत करण्याबाबत**.

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** 5 कर्मचारी सेवा सोडुन गेल्याने त्यांना त्यांच्या खाती जमा असलेल्या रक्कमा प्रदान केल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-2011/प्र.क्र.76/ आस्था-11, दिनांक 11/05/2012 नुसार जिल्हा परिषद कर्मचाऱ्याने नियत वयोमानापुर्वी सेवात्याग केल्यास वरील शासन निर्णयाला जोडलेल्या जोडपत्र -1 नुसार कार्यवाही करण्याबाबत निर्देश आहेत.

सदर जोडपत्र-1 मधील अ.क्र. 4 नुसार पुर्वीची सेवा जोडुन दिलेल्या कर्मचाऱ्यास केवळ त्याचे अंशदान व त्यावरील व्याज परत मिळेल असे नमुद आहे, वरीलप्रमाणे कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषदेची सेवा सोडुन अन्य शासन सेवेत गेल्याचे संबंधीत नस्तीवरुन दिसुन आले. तरी वरील सर्व कर्मचाऱ्याना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या अंशदानाची अधिक शासन हिस्सा व त्यावरील व्याजासह प्रदान केलेले आहे, याबाबत नस्तीची तपासणी केली असता उपरोक्त शासन निर्णयावर उपसचिव यांचे सभेत अंशदानाचा मुद्दा उपस्थित केला असता कर्मचाऱ्याचे अंशदान + शासन हिस्सा व त्यावरील व्याज देय राहिल असे नमुद करुन संबंधीत कर्मचाऱ्यांना अंतीम रक्कमेचे प्रदान केले. याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 4, दिनांक 17/04/2017 अन्वये सदर मुद्दा कोणत्या सभेत उपस्थित केला तसेच उपसचिव कोण व कोणत्या खात्याचे होते, तसेच याबाबत कोणते लेखी स्वरुपात आदेश, परिपत्रक, शासन निर्णय सादर करण्याबाबत दस्ताऐवजासह खुलासा मागविला असता कोणतेही उत्तरे प्राप्त न झाल्याने शासन हिस्सा व व्याजाची रक्कम वरील शासन निर्णयाचे उल्लंघन करुन दिल्याने शासनाचे नुकसान झाल्याचे स्पष्ट होते.

**3.1008 सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नमुना 89 Broad Sheet बाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2015-16 च्या लेखापरीक्षणास सादर केलेल्या नमुना 89 Broad Sheetची तपासणी कोषागाराचे ताळमेळ पत्रकासोबत केली असता तफावत आढळुन आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-16 च्या लेखापरीक्षणास सादर केलेल्या संगणीकृत नमुना 89 बृहत पत्रकाची [ Broad Sheet } तपासणी कोषागाराच्या ताळमेळ पत्रकाशी केली असता तफावत आढळुन आली.

नमुना 89 ला खातेधारकाचे खात्यातील जमा रक्कमा, काढलेल्या रक्कमा, व्याजाची परीगणना, सुरू शिल्लक व अखेरची शिल्लक या मधील कोणत्याही रक्कमेचा मेळ कोषागाराचे रक्कमेशी जुळत नाही. त्यामुळे जिल्हा परीषद भंडाराने ठेवलेली नमुना 89 नोंदवही अचुक नसल्याचे दिसते. नमुना 89 व कोषागार ताळमेळ पत्रकातील तफावत शोधुन दुर करणे आवश्यक आहे. या बाबत जबाबदारी निर्धारीत करून कारवाई करणे आवश्यक वाटते.

**3.1009 भविष्य निर्वाह निधी च्या चुकीच्या परिगणनेमुळे व्याजाचे जादा प्रदान.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सन 2015-2016 चे लेखापरीक्षणामध्ये कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी खात्याची मागील ओढण्यात आलेली शिल्लकेची पडताळणी लेख्या सोबत पडताळून पाहिली असता असे निदर्शनास आले कि,श्री डी.बी.दहीवाले (फार्माशीस्ट) यांचे भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक C-716 मध्ये सन 2014-15 ला व्याजाची परीगणना करतांणा प्रगत बेरीज ही 18,80,840/- घेण्यात आली व त्या रक्कमेच्या सरासरीवर 8.7 टक्के प्रमाणे रुपये 13,636/- व्याज संबंधीताचे लेख्यात घेऊन लेखा बंद करून शिल्लक पुढे ओढण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात लेख्याची तपासणी केली असता प्रगत बेरीज ही रुपये 9,80,840/- आहे. आणी यावर अनुज्ञेय व्याज रूपये 7,111/- येत असल्याने दिलेले व्याज रुपये 13,636 - 7,111= रुपये 6,525/- ची दुरुस्ती करून पूर्तता अनुपालन दर्शविण्यात यावे.

**3.1010 6 व्या वेतन आयोगाचे हप्ते जमा न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** भविष्य निर्वाह निधी सन 2015-16 चे लेखापरीक्षण करित असतांना खातेधारक याना 6 व्या वेतन आयोगाचे हप्ते जमा च करण्यात आले नांही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक क्रमांक वेपूर-1209/प्र.क्र.69/सेवा 9, दिनांक 29/04/2009 मधील अनुक्रमांक 14 नियम क्र. 15 अन्वये 5 वर्षात 5 समान हप्त्यात शासकीय कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करावयाच्या आहे. 15.3 आहरण व संवितरण अधिका-याने थकबाकी दर वषी जून महिन्यात जमा करावी. असे शासन निर्णय नमूद करण्यात आले आहे. तसेच थकबाकी हप्ता प्रदान करतांना त्याची नोंद सेवापुस्तकात घेणे आवश्यक आहे. नियमा प्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

2) खातेधारक याचे खात्यात 6 व्या वेतन आयोगाचे हप्ते जमा होणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नांही. तसेच 6 व्या वेतन आयोगाचे हप्ते जमा न करणेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.1011 सन 2015-2016 या वित्त्तीय वर्षातील अंतिम सुधारित व्याज समायोजन न झाल्याबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** जिल्हा परिषद, भविष्य निर्वाह निधी, विभागातील सन 2015-16 या वित्त्तीय वर्षाचे लेखा तपासणी केली असता, सन 2015-2016 या वित्त्तीय वर्षातील अंतिम सुधारित व्याज समायोजन झाले नसल्याचे आढळले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भविष्य निर्वाह निधी विभागाचे सन 2015-16 या वित्त्तीय वर्षातील लेखापरिक्षण केले असता, सन 2003-2004 पासुन व्याजासाठी अंतिम सुधारीत अनुदान अप्राप्त असल्याने समायोजना अभावी व्याजाची एकूण रक्कम रुपये 49,25,00,634/- तफावत असल्याचे आढळून आले आहे.

2) कार्यालय, महालेखाकार (लेखा व हकदारी) द्वितीय, महाराष्ट्र नागपूर यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक-संस्था-चा.ले. 2/8336/ना.ज./ब्याज/2015-2016, दिनांक नमुद नाही नुसार मुख्य लेखाशिर्ष 8336 नागरी जमा 800 अन्य जमा के अंतर्गत जिल्हा परिषद, भविष्य निर्वाह निधी सन 2015-2016 मध्ये मुख्य लेखाशिर्ष 2049 अन्वये

रक्कम रुपये 19,75,21,000/- जमा केल्यानंतर सन 2015-2016 चे थकीत व्याजाचे समायोजना अभावी रुपये 49,25,00,634/- प्रलंबित/थकीत असल्याचे आढळून आले आहे.

3) सन 2015-2016 या वर्षाचे व्याजासाठी अंतीम सुधारीत अनुदान महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक बिजीटी-2016/प्र.क्र.18/वित्त्त-1, दिनांक 29/03/2016 अन्वये लेखाशिर्ष-20490771), भारीत अन्वये रक्कम रुपये 19,75,21,000/- पुस्तकी समायोजीत अनुदान जिल्हा परिषद गडचिरोली ला प्राप्त झाले असून तेवढयाच रक्कमेचे समायोजन झाल्याचे आढळले. परंतु सन 2003-2004 पासुन प्रलंबित (थकीत) व्याजापोटी रक्कम रुपये 49,25,00,634/- समायोजन होणे बाकी आहे. तरी थकीत रक्कम समायोजनाबाबतची कार्यवाही करावी.

**3.1012 भविष्य निर्वाह निधीचे सन 2014-2015 चे वैयक्तीक खाते अपुर्ण असतांना सन 2015-2016 मध्ये ना परतावा अग्रीम मंजुरीबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** जिल्हा परिषद, औरंगाबाद भविष्य निर्वाह निधी विभागाचे सन 2015-2016 चे लेखापरिक्षणात नमुना नंबर 88 वैयक्तीक खतावणी नोंदवहयांची तपासणी केली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 चे नियम 12 मधील तरतुदी नुसार वित्तीय वर्षअखेर कर्मचा-यांच्या खाती शिल्लक असलेल्या रकमेवर व्याजाची आकारणी करुन नियम 36(1) नुसार कर्मचा-यांना मार्च अखेर खात्यात सुरुवातीची शिल्लक वर्षातील जमा व वर्षातील उचल अधिक व्याज व अखेरची शिल्लक असलेले विवरणपत्र देण्यात येईल. नियम 36(2) नुसार कर्मचा-याने सदर विवरणपत्र प्राप्त झाल्यापासुन तीन महिन्याचे आत विवरण पत्रातील शिल्लक रक्कम अचुक असल्याबाबत खात्री करणे आवश्यक आहे. तसेच वैयक्तीक खात्यावर वित्त विभागाचे उपलेखापाल, लेखाधिकारी, वरिष्ठ लेखाधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे वैयक्तीक खात्यातील नोंदी अचुक असल्याची खात्री करता आलेली नाही.

2) भविष्य निर्वाह निधीचे सन 2015-2016 चे वैयक्तीक खाते अपुर्ण असतांना सन 2015-2016 या वित्तीय वर्षात ना परतावा अग्रीम मंजूर केलेले आहे. त्यांचे वैयक्तीक खात्यात ना परतावा अग्रीम मंजुर करतांना किती रक्कम शिल्लक होती? याची खात्री करता आलेली नाही. त्यांचे खात्यावर शिल्लक कमी असतांना जास्त रक्कमेची ना परतावा अग्रीम प्रदान झाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरील ना परतावा अग्रीम हे नियमबाहय मंजुर करण्यात आलेले आहे. तरी सर्व वैयक्तीक खात्याची शिल्लक रक्कमेबाबत पडताळणी करुन अनुपालन दर्शवावे. ना परतावा अग्रीम हे नियमबाहय मंजूर केल्याबाबत खुलासा करावा.

3) भविष्य निर्वाह निधीचे सन 2015-2016 चे वैयक्तीक खाते नोंदवही नमुना नंबर 88 सर्व वैयक्तीक खात्यावर सुरवातीची शिल्लक वर्षातील जमा वर्षातील उचल अधिक व्याज व अखेरची शिल्लक वित्त विभागाचे उपलेखापाल, लेखाधिकारी, वरिष्ठ लेखाधिकारी यांनी स्वाक्षरी करुन त्याबाबत विवरणपत्र देण्यात यावे. कार्यवाहीअंती अनुपालन दयावे.

**3.1013 बृहतपत्रक, खाते नोंदवही, दैनिक पुस्तक व कोषागार पासबुक यांचा ताळमेळ न घेतल्याबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद औरंगाबाद भविष्य निर्वाह निधी विभाग सन 2015-2016 चे लेखापरीक्षण करीत असतांना विभागाने भविष्य निर्वाह निधी बृहतपत्रक, खातेनोंदवही, दैनिक पुस्तक व कोषागार पासबुक नोंदवहयाचा ताळमेळबाबत कार्यवाही केल्याचे दिसुन आले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 234 नुसार प्रत्येक महिन्याअखेर पुर्वी वर्गणीचे परतावे व इतर बाबी नमुना नंबर 88 चे खाते वहीवरुन नमुना नंबर 89 मधील बृहतपत्रकात नोंदविणे आवश्यक असून महिन्याची एकुण जमा व काढलेल्या रक्कमा नमुना नंबर 87 मधील दैनिक नोंदवहीतील नोंदीशी जुळविणे आवश्यक आहे. त्याबाबत ताळमेळ घेण्यात आलेला नाही.

2) लेखा संहिता नियम 235 नुसार वर्षाचे अखेरीस बृहत पत्रकातील जमांची बेरीज करुन व अर्जित व्याजाची गणना करुन योग्य रकान्यामध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. तथापि, सन 2015-2016 मधील नमुना नंबर 88 व नमुना नंबर 89 मध्ये खाते नोंदवहयामध्ये सर्व खातेदारांच्या नोंदी घेतलेल्या नाहीत. तसेच नमुना नंबर 88 च्या खाते नोंदवहीचा बृहत पत्रकाशी मेळ घातलेला नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1968 चे नियम 50(5) नुसार पंचायत समित्यांकडुन त्यांनी कपात केलेल्या रक्कमा विभागास प्राप्त झाल्याबाबत बँक स्क्रोल / कोषागार पडताळणी जमा विवरणपत्र अभावी खात्री करता आलेली नाही. त्यामुळे आहरण व संवितरण अधिकारी यांनी कपात केलेल्या सर्व भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमा अचुक जमा झाल्याबाबत खात्री करता आलेली नाही. याबाबत पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

**3.1014 जिल्हा परिषद कर्मच-यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनांच्या अंमलबजावणी व अभिलेख्यांतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्र क्रमांक अंनियो/1007/ सं.क्र.1152/ प्र.क्र.181/आस्था-11, दिनांक 12/09/2007 अन्वये दिनांक 01/11/2005 व त्या नंतर सेवेत रुजू होणाऱ्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यां ना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आलेली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीकरिता ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो1007/प्र.क्र.181/आस्था-11 दिनांक 21/05/2010 अन्वये कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजने संबंधीचे लेखे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी ठेवावयाचे आहेत.

2) जिल्हा बीड अंतर्गत सन 2015-2016 अखेर कार्यरत असलेले एकुण 1125 कर्मचाऱ्यांची डी.सी.पी.एस. खाती आहेत.

3) परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे स्वतंत्र रोखपुस्तक ठेवणे आवश्यक असताना रोखपुस्तकच तयार करण्यात आलेले नाही. केवळ अनुसुची वरुन नमुना 11 वर नोंदी घेण्यात येवून ट्रेझरी पासबुकशी त्यांची जुळवणी केली जाते. हे नियमबाहय असुन अनुसुची वरुन नमुना 11 वर धनादेशाच्या नोंदी घेण्यात येवून रोखपुस्तकात सदर नोंदी घेणे आवश्यक आहे व रोखपुस्तक व ट्रेझरी पासबुकच्या नोंदी तपासणे बंधनकारक आहे. परंतु, अशी कार्यवाही करण्यात येत नाही.

4) सर्व कर्मचाऱ्यांचे अभिलेखे तयार करण्यात आलेले नाहीत. त्या मुळे प्रत्येक कर्मचाऱ्याची मासिक व वार्षिक जमा रकमा व त्यावरील व्याजाची गणना, शासनाकडुन प्राप्त अंशदान, शासनाकडुन प्राप्त व्याज, शासनाकडुन केलेली व्याजाची व अंशदानाची मागणी इत्यादीची सुयोग्य तपासणी करता आलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक अंनियो-1007/प्र.क्र.181/आस्था-11, दिनांक 21/05/2010 मधील परिच्छेद क्रमांक 23 अन्वये आर-3 (वार्षिक विवरणपत्र) संबंधीत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांमार्फत कर्मचाऱ्यास दिनांक 30 जुन पर्यंत पाठवणे आवश्यक आहे. परंतु, विभागाने सन 2015-2016 पर्यंतचे आर-3 संबंधीतांना पाठविण्याची कार्यवाही केली नसल्याचे आढळुन आले.

6) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक अंनियो-1007/प्र.क्र.181/आस्था-11, दिनांक 21/05/2010 मधील परिच्छेद क्रमांक 21 अन्वये जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची अंशदानाची व तसेच शासनाच्या जिल्हा परिषदेच्या सममुल्य अंशदान रक्कम शासनास भरणा केल्याबाबत आर-7 मध्ये दरमहा तयार करुन जिल्हा कोषागार कार्यालयाकडुन ताळमेळ घेण्यात येवून प्रमाणपत्र प्राप्त करुनघेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7) सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे भविष्य निर्वाह निधी विभाग, जिल्हा परिषद बीडचे लेखापरिक्षण करताना जिल्हा परिषद अंतर्गत विभाग व पंचायत समिती अंतर्गत कर्मचा-यांना सन 2015-2016 या वर्षाचे DCPS

विवरणपत्रे वाटप केले नसल्याचे दिसुन आले. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 01 दिनांक 16/06/2017 अन्वये मागणी करुनही लेखा परिक्षणात DCPS विवरणपत्र वाटप केल्याची पोच दिसुन आली नाही.

**3.1015 ना परतावा अग्रिमाची रक्कम वजा न करता व व्याज जादा प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** भविष्य निर्वाह निधी विभाग, जिल्हा परिषद, हिंगोलीचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात पत्नीच्या आजारापणासाठी, घरबांधकाम इत्यादींकरीता ना परतावा अग्रिम घेण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

तीन कर्मचाऱ्यांनी ना-परतावा अग्रिम घेतलेले असताना त्यांचे व्याजाची परिगणना करताना ना-परतावा अग्रिम घेतल्यावर राहिलेल्या शिल्लक रकमेवर व्याजाची परिगणना करणे आवश्यक आहे. परंतु त्यांनी घेतलेल्या ना-परतावा अग्रीम विचारात न घेता सरसकट व्याज दिलेले आहे व ना-परतावा अग्रिम नोंद त्यांच्या लेख्यांत घेण्यात आलेली नाही. त्यामुळे संबंधिताचे अखेर शिल्लक रक्कम जादा असल्याचे दिसून येते. झालेल्या जादा व्याजाची परिगणना करुन व्याजाची रक्कम वसूलात आणावी. तसेच ना-परतावा अग्रिम दिलेची नोंद सन 2015-2016 विवरणपत्रात दर्शवून सुधारीत विवरणपत्र लेखापरीक्षणास दर्शवावे व अनुपालन दर्शवावे. तसेच उपरोक्त उदाहरणे निवड महिन्यातील असुन याबाबत उर्वरित महिन्यामध्ये अशा प्रकारची अनियमितता झाल्याचे शक्यता नाकारता येत नाही.

**3.1016 अखेर शिल्लक जादा दर्शविलेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परिषद नांदेड, भविष्य निर्वाह निधी सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणात श्री.पांगरेकर व्ही.जी. यांची अखेर शिल्लक जादा दर्शविण्यात आलेली आहे.

एकुण जमा रुपये 4,30,634/- सदर वर्षात माहे 09/2015 मध्ये उचल रक्कम रूपये 4,17,779/- अखेर शिल्लक रूपये 12,855/- दर्शविण्याऐवजी रक्कम रूपये 74,368/- दर्शविण्यात आलेली आहे. तरी जादा शिल्लक रक्कम रूपये 61,513/- बाबत योग्य अनुपालन दर्शविण्यात यावे.

**3.1017 सहाव्या वेतन आयोगाचा 4 व 5 वा हप्ता पुरवणी देयकाच्या रक्कमा भविष्य निर्वाह निधी वर्गणी मध्ये दुबार जमा /भरणा केलेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** भविष्य निर्वाह निधी विभाग, जिल्हा परिषद लातूर सन 2015-16 च्या लेखापरीक्षणात असे दिसून आले कि, सहाव्या वेतन आयोगाचा चौथा व पाचवा हप्ता पुरवणी देयकाच्या रक्कमा भविष्य निर्वाह निधी खाते शालार्थ देयक /चलनाने गटशिक्षणाधिकारी कार्यालय औसा अंतर्गत दुबार जमा/भरणा करण्यात आलेल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 221 मधील भविष्य निर्वाह निधी नमुना नंबर 88 मध्ये लेखे अद्ययावत नोंदीसह परिपूर्ण नसल्याबाबत योग्य तो खुलासा करावा.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, आदेश क्रमांक झेड.पी.ए.-2000/प्र.क्र.56/33 दिनांक 17/04/2001 अन्वये वरिष्ठ लेखा अधिकारी वर्ग-1, परिशिष्ट-2 अ.क्र.3 वित्त विभागाचे प्रकरणात कर्तव्ये करते वेळी योग्य प्रकारे जबाबदारी पार पाडण्याची कार्यवाही अनुसरण्यात आलेली दिसून येत नाही. परिशिष्ट-3 लेखामधील अ.क्र.2 मधील 1 व 2 प्रमाणे लेखाधिकारी-1 यांनी आपली कर्तव्य पार पाडताना अनुकूल कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. उक्त शासन निर्णयाची अंमलबजावणी योग्य प्रकारे न करता भविष्य निर्वाह निधी विभागाचे लेखे /अभिलेखे अपूर्ण ठेवलेबाबत साधार लेख्याआधारे सत्यता दर्शवून अनुपालन अहवाल सादर करावा.

3) श्री.बोयणे पी.व्ही. सहशिक्षक, जिल्हा परिषद, केंद्रीय प्राथमिक शाळा सेलू, तालुका औसा यांची सहाव्या वेतन आयोगाच्या चौथ्या व पाचव्या हप्त्याची रक्कम रुपये 42,486/- एवढी खाते क्रमांक ZPL/EDN-10750 ब्रॉडशिट नमुना नंबर 89 पृष्ठ क्र.12 माहे 4/2015 अन्वये च्या शालार्थ वेतन देयकातून शेड्युल क्रमांक 44 दिनांक

23/04/2015 अन्वये गटशिक्षणाधिकारी कार्यालयातून कपात करून भविष्य निर्वाह खाते जमा करण्यात आलेली आहे. तसेच श्री.जी.एन.ढगे सहशिक्षक, केंद्रीय प्राथमिक शाळा लोदगा, तालुका औसा यांचीही सहाव्या वेतन आयोगाच्या चौथ्या व पाचव्या हप्त्याची रक्कम रुपये 30,000/- एवढी खाते क्रमांक EDN-9779 ब्रॉडशिट नमुना नंबर 89 माहे 4/2015 च्या शालार्थ वेतन देयकातून शेड्युल क्र.55 दिनांक 23/04/2015 अन्वये गटशिक्षणाधिकारी कार्यालयातून कपात करून भविष्य निर्वाह निधी खाते जमा करण्यात आलेली आहे.

4) तथापि दिनांक 20/05/2015 रोजी चलनाने डी.डी.क्रमांक 886618 रक्कम रुपये 8,17,767/- प्र.क्र.06, दिनांक 13/04/2015 अन्वये मुख्याध्यापक, केंद्रीय प्राथमिक शाळा सेलू, तालुका औसा यांनी बोयणे पी.व्ही. यांचे भविष्य निर्वाह निधी वर्गणी कपात रक्कम रुपये 42,486/- व प्र.क्र.55, दिनांक 16/04/2015 रोजी चलनाने डी.डी.क्रमांक 886618, रक्कम रुपये 8,17,767/- अन्वये रक्कम रुपये 30,000/- श्री.जी.एन.ढगे केंद्रीय प्राथमिक शाळा, लोदगा यांचे नावे कपात करण्यात आली आहे. कोणत्या प्रयोजनार्थ दुबार 4 व 5 हप्ते ची वेतन आयोगाच्या रक्कमा जमा करण्यात आल्या याचा बोध लेखापरीक्षणात होऊ शकला नाही. साधार लेख्याआधारे पूर्तता दर्शवावी.

5) श्री.बोयणे पी.व्ही. यांचे भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक EDN-10750 असून लेजर नमुना नंबर 88 मध्ये EDN-21 पृष्ठ क्र.194 सन 2015-16 मध्ये वर्गणी रक्कम रुपये 42,486/- एवढी जमा नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे व्याजाची परिगणना चुकीचे झाल्याचे सुकृतदर्शनी दिसून येते याबाबत अचूक व्याज परिगणना करून साधार लेख्या आधारे सत्यता दर्शवावी.

6) श्री.जी.एन.ढगे यांचे भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक 9779 असून लेजर नमुना नंबर 88 पृष्ठ क्र.178 वर हप्त्याची रक्कम रुपये 30,000/- जमा असल्याची नोंद घेण्यात आलेली नाही. सदरील रक्कमेच्या नोंदी घेवून लेजर पूर्ण करून योग्य त्या रक्कमाच्या बेरजा व व्याजाची परिगणना करून लेखे पूर्णपणे अद्ययावत करून अनुपालन दर्शवावे.

7) भविष्य निर्वाह निधी लेखे नमुना नंबर 89 वर वरिष्ठ लेखाधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या केलेल्या दिसून येत नाही पूर्तता दर्शवावी.

8) वरिष्ठ लेखाधिकारी भविष्य निर्वाह निधी विभागाने बँक पासबुकाशी व कोषागार लेख्यातील रक्कमेचा ताळमेळ घेवून पूर्तता दर्शवावी.